जपासनी झोमलदार/अधिकारी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** कोतवाली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1118 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/09/2023 20:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 08/09/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/09/2023
**Time From (वेळेपासून):** 14:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/09/2023 **Time (वेळ):** 20:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 054

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/09/2023 20:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भाजीमार्केट अहमदनगर येथे , अहमदनगर पतसंस्था फेडरेशन येथी,अहमदनगर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रामदास छबू तांबे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भोरवाडी, ताजिअहमदनगर,अहमदनगर,कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भोरवाडी, ताजिअहमदनगर,अहमदनगर,कोतवाली,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8605421236

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | यासीन नासर अरब | | | 1. भुशणनगर,कारमील हायस्कुल, पेजारी,केडगाव तानगर , अहमदनगर ,कोतवाली, अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी रामदास छबू तांबे वय-38 वर्षे, धंदा- षेती, रा. भोरवाडी, ता.जि.अहमदनगर, मो. नं. 86054212365

समक्ष फिर्याद देतो की, मी वरिल पत्यावर कुटुंबासह राहण्यास असुन मी दि.07/09/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अहमदनगर कार्यालयात दुपारी चार वाजेचे सुमारास हजर होवुन श्री.षरद गोर्डे, पोलीस निरीक्षक,यांना एका लोकसेवका विरूध्द लाच मागणीची तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि गोर्डे यांनी मला पोलीस उपअधीक्षक श्री. लोखंडे यांच्या खोलीत घेवुन गेले. त्यावेळी मी माझी तक्रार श्री.लोखंडे यांना सांगितली, त्यांनतर पोनि गोर्डे यांनी दोन पंचाना व सापळा पथकातील अंमलदार यांना बोलावुन घेतले. त्यावेळी मी पंचासमक्ष मी माझी तक्रार सांगितली की, '' मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन भोरवाडी षिवारात षेत गट नं. 499 मध्ये माझी 1 हेक्टर 30 आर जमिन आहे. सदर जमिन ही माझी आई आषाबाई छबू तांबे व माझे मामा बबन गेणा जाधव यांच्या नावावर आहे. सदर जमीन मी स्वतः करतो. मी भैरवनाथ ग्रामीण बिगर षेती सहकारी पतसंस्था मर्या केडगाव ता.नगर येथुन दि. 18/08/2016 रोजी माझ्या नावावर 5,00,000/- रूपये कर्ज घेतले होते. त्यावेळी पतसंस्थेस सदर जमीन तारण म्हणुन दिली होती. सदर कर्ज फेडीसाठी मला 5 वर्शाची मुदत दिली होती. सदरचे कर्ज मी मुदतीत फेड करू षकलो नव्हतो. मी दि.31.08.2023 रोजी पुर्ण कर्जफेड केलेली आहे. परंतु अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषनचे श्री.अरब साहेब हे मला कर्ज फेड करण्यासाठी मुदत दिली, माझया जमीनीवर जप्ती येवु दिली नाही,जमीनीचा लिलाव होवु दिला नाही असे म्हणुन 30,000 रुपये लाच मागणी करत असलेबाबत सविस्तर तक्रार दिली.

त्यानंतर मी श्री अरब यांचे विरूध्द माझया तक्रारीनुसार पडताळणी करण्याचे ठरले. पोनि गोर्डे यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरी कार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी पुन्हा व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन पंच नं 1 यांचेसह मला माझे मोटार सायकल क्र.एमएच 16 सी.आर 1279 वरून रवाना केले. त्याप्रमाणे मी श्री. अरब यांची अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन येथे जावुन भेट घेतली असता त्यांनी माझेशी माझ्या जमीनीवरील कर्ज प्रकरणा बाबत तसेच जमीनीची जप्ती होवुन दिली नाही व सहकार्य केले असे म्हणाले. आमचे भेटी दरम्यान श्री. अरब यांनी माझेकडे स्पष्टपणे लाच मागणी केली नाही. त्यामुळे मी पोनि गोर्डे यांना सदरची कार्यवाही तात्पुरती स्थगित करण्यास सांगितले. त्याप्रमाणे सदर कार्यवाही स्थगित करण्यात आली.श्री.अरब यांनी मला संपर्क केल्यास त्वरीत कळविणेबाबत व गोपणीयतेच्या सुचना देवुन मला घरी जाणेस मोकळीक दिली.

त्यानंतर दिनांक 08/09/2023 रोजी दुपारी सव्वादोन वाजेचे सुमारास मी अँन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर येथे आलो. तेथे पोनि गोर्डे,दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते. त्यावेळी मी पोनि गोर्डे यांना सांगीतले की ,श्री. अरब यांनी मला माझे मोबाईल वर फोन करून आज भेटण्यासाठी बोलाविले आहे. त्यानुसार दिनांक 08/09/2023 रोजी लाच मागणी पडताळणी आयोजित करण्याचे ठरले. त्याप्रमाणे पोनि गोर्डे यांनी मला, पंचाना व सापळा पथकातील कर्मचाÚयांना आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून, त्या मेमरी कार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन पंच नं 1 यांचेसह मला माझे मोटार सायकल क्र. एमएच 16 सी.आर 1279 वरून रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 असे माझे मोटार सायकलवरून अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन येथे गेलो. त्याठिकाणी गेल्यानंतर मी श्री.अरब यांना मोबाईलवरून कॉल करून कार्यालयाचे खाली आल्याचे सांगितले असता श्री. अरब यांनी मला त्यांचे कार्यालयामध्ये येण्यास सांगितले, त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 असे अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन गेलो. त्यावेळी श्री अरब यांनी माझेबरोबर

असलेले पंच नं.1 यांना बाहेर बसण्यास सांगितले त्याप्रमाणे काही अंतरावर जावुन थांबले. त्यांनतर श्री. अरब यांनी मला माझी जमीनीवर जप्ती येवु दिली नाही व सहकार्य केले त्या मोबदल्यात बक्षीस म्हणुन प्रथमतः 30,000/- रूपये लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती 20,000/- रूपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. लोकसेवक अरब यांनी मागणी केलेल्या 20,000/- रूपयांपैकी पहिला हप्ता म्हणुन 7,000/- रूपये प्रथम स्विकारण्यास तयार दर्शविली व 13,000/- रूपये उदया किंवा परवा आणुन दया असे म्हणाले. त्यानंतर मी पंच नं. 1 सह रवाना केले त्या सुरक्षित ठिकाणी परत आलो. पोनि गोर्डे यांनी मला व पंच नं.1 यांना पंच नं. 2 समक्ष विचारणा केली व माझेत आणि लोकसेवक अरब यांचेत समक्ष भेटीत ध्वनिमुद्रित झालेले संभाषण ऐकुन श्री. अरब यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाल्याने अरब यांचेविरूध्द अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले.

मी पहिला हप्ता लाच म्हणुन देण्यासाठी हजर केलेल्या 7000/- रूपयांच्या नोटांचे नंबर लिहुन घेवुन त्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावुन प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिषात ठेवुन मला व दोन्ही पंचांना आणि सापळा पथकाला पोनि गोर्डे यांनी आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेवरून पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला व मला पंच नं. 1 यांचेसह माझे मोटार सायकलवरुन रवाना केले व आमचे पाठोपाठ पोनि गोर्डे, पंच नं. 2 व सापळा पथक षासकिय वाहनाने येवुन अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन चे आजूबाजूस सापळा लावुन थांबुन राहिले. त्यावेळी मी श्री. अरब यांना फोन करून कार्यालयाच्या बाहेर आले बाबत सांगितल्याने श्री.अरब हे माझ्याकडे आले व मला ऑफिस मध्ये बसु असे म्हणाले, त्यावर मी, पंच नं.1 व श्री. अरब असे अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन गेलो. कार्यालयातील खुर्चीवर बसल्यानंतर श्री. अरब यांनी मला पैसे ऑनलाईन टाकण्याबाबत सांगितले, त्यावर मी त्यांना कॅष आहेत साहेब, फोन पे झाले नाही, कॅष घ्यायला काय अडचण आहे त्यावर श्री. अरब यांनी ते कॅश पैसे घेत नसल्याचे म्हणुन फोन करतो असे सांगितले. त्यांनतर मी व पंच असे ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो.

त्यानंतर मी व पंच परत लाप्रवि कार्यालय येथे येत असतांना माझ्या मोबाईलवर श्री. अरब यांचे दोन फोन आल्याबाबत पोनि गोर्डे यांना सांगितले. त्यानंतर पोनि गोर्डे यांचे सुचनेवरुन मी माझ्या मोबाईल क्रमांक 8605421265 वरुन श्री. अरब यांच्या मोबाईल क्रमांक 9511350350 यावर स्पीकर ऑन करून फोन लावला असता श्री. अरब यांनी फोन पे वर पैसे टाकण्यास सांगितले. त्यानंतर पोनि गोर्डे यांनी मला ऑनलाईन पाठविण्यासाठी रकमेबाबत विचारले परंतु माझ्या अकाऊंटवर बॅलन्स नसल्याने तसेच माझी पत्नी प्रेग्नंट असल्याने तिला दवाखान्यात घेवुन जायचे होते म्हणुन मी माझे काम आटोपल्यावर मी पुढील कारवाई साठी हजर राहील असे पोनि गोर्डे यांना सांगितले तुर्तास कारवाई थांबवावी असे सांगितल्याने सर्वानुमते सदर सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे ठरले.

त्यानंतर मी दिनांक 12.09.2023 रोजी माझया अकाउंटला 7000/- रुपये जमा करुन दुपारी अडीच वाजेचे सुमारास लाप्रवि कार्यालय, अहमदनगर येथे हजर झालो, सदर ठिकाणी पोनि गोर्डे, दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते. पण श्री अरब हे कार्यालयात हजर नसल्याची माहिती मिळाल्याने सदर कारवाई तात्पुरती स्थगीत करण्यात येवुन दिनांक 13.09.2023 रोजी 11.00 वाजता कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर दिनांक 13.09.2023 रोजी मला दवाखान्याचे काम असल्यामुळे मला मला लाप्रवि कार्यालयात येण्यास थोडा उषीर झाला, मी दुपारी एक वाजेचे सुमारास लाप्रवि कार्यालय अहमदनगर येथे हजर झालो. सदर ठिकाणी पोनि गोर्डे, दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते. परंतु श्री.अरब हे कार्यालयात हजर माहिती मिळाल्याने सदर कारवाई तात्पुरती स्थगीत करण्यात येवुन दिनांक 15.09.2023 रोजी 11.00 वाजता कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर दिनांक 15.09.2023 रोजी मी 10.00 वाजता लाप्रवि कार्यालय,अहमदनगर येथे हजर झालो,पोनि गोर्डे,दोन्ही पंच व सापळा पथक हजर होते,त्यावेळी सर्वानुमते श्री अरब यांचे विरुध्द सापळा आयोजीत करण्याचे ठरले त्यानंतर मी, पोलीस उप अधीक्षक श्री लोखंडे, पोनि गोर्डे, दोन्ही पंच व सापळा पथक असे लाप्रवि कार्यालय येथुन षासकीय वाहनाने कोठी रोडवरील अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषनच्या जवळ सुरक्षीत ठिकाणी सकाळी 10.30 वाजेचे सुमारास पोहचलो. त्यावेळी पोनि गोर्डे यांनी मला,पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या,त्यानंतर थोडया वेळाने श्री अरब हे कार्यालयात हजर असल्याची पोनि गोर्डे यांना माहिती मिळाली, त्यानंतर 11.05 वाजता मी माझया फोन पे वरुन श्री अरब यांचे मोबाईल नं 9511350350

वरील फोन पे ला त्यांनी सांगीतल्याप्रमाणे 7000 रुपये सेंड केले व त्यांना फोन कॉल केला असता त्यांनी तो कॉल घेतला नाही.

त्यांनतर मी, पोलीस उप अधीक्षक श्री लोखंडे, पोनि गोर्डे, दोन्ही पंच व सापळा पथक असे सर्वजण अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषनच्या कार्यालयात गेलो तेथे श्री.अरब साहेब व एक इसम बसलेले होते. त्यावेळी पोनि गोर्डे यांनी पंच नं 1 यांना अरब साहेब कोणते आहे असे विचारले असता पंच नं 1 यांनी अरब साहेबाकडे बोट दाखवुन हे अरब साहेब आहेत असे सांगीतले.त्यावेळी पोनि गोर्डे यांनी त्यांना स्वतःची ओळख सांगुन त्यांचा मोबाईल अनलॉक करुन ताब्यात घेतला व पंचासमक्ष त्यांचे फोन पे चेक केले असता त्यांच्या फोन पे ला मी सेंड केलेले 7000/- रुपये जमा झाल्याचे दिसुन आले. त्यावेळी पोनि गोर्डे यांनी श्री अरब यांना सदर कारवाई बाबत माहिती दिली व त्यांचे नाव व विचारले असता त्यांनी त्यांचे नाव यासीन नासर अरब वय 42 वर्षे , विषेश वसुली व विक्री अधिकारी अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन, पतसंस्था अहमदनगर, मो.नं 9511350350 रा. भुशणनगर,कारमील हायस्कुल षेजारी,केडगाव ता.नगर जि.अहमदनगर असे सांगीतले. त्यावेळी पोनि गोर्डे व सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले, त्यानंतर आंम्ही सर्वजण शासकीय वाहनाने लाप्रवि कार्यालयात आलो.त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले.

तरी व दिनांक 08.09.2023 रोजीचे लाच मागणी पडताळणी कारवाई व लाचेचा सापळा कारवाईच्या वेळी दुपारी 02.50 ते सायंकाळी 5.25 वाजेचे दरम्यान व तदनंतर सायंकाळी 5.48 ते 5.50 वाजेचे दरम्यान मोबाईल फोनवर यातील आरोपी लोकसेवक यासीन नासर अरब वय 42 वर्षे , विषेश वसुली व विक्री अधिकारी अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेषन, पतसंस्था अहमदनगर, मो.नं 95350350 रा. भुशणनगर,कारमील हायस्कुल षेजारी,केडगाव ता.नगर जि.अहमदनगर यांनी माझया कर्ज फेड प्रकरणामध्ये मला कर्ज फेड करण्यासठी मुदत दिली, माझया जमीनीवर जप्ती येवु दिली नाही, माझया जमीनीचा लिलाव होवु दिला नाही म्हणुन माझ्याकडे प्रथम 30,000/- रुपये लाच मागणी करुन तडजोडीअंती 20,000 रुपये लाच मागणी केली व त्यापैकी पहिला हप्ता म्हणुन 7000/- रुपये फोन पे व्दारे स्वीकारण्याचे मान्य करुन ती 7000/- रुपये लाच रक्कम आज दिनांक 15.09.2023 रोजी 11.05 वाजेचे सुमारास स्वीकारली म्हणुन माझी

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

chandrashekhar mohankrao yadav(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Tamb C. R.C

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.हे.कॉ./१५१
शरद सी. वाघ
कोतवाली पो.स्टे., अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): chandrashekhar mo
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):